# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 02 April 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०२ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग, परभणीतून विद्यमान खासदार संजय जाधव तर नांदेडमधून प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे अर्ज दाखल
- नांदेड तसंच लातूर इथं मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम
- पतंजली आयुर्वेद कंपनीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरात प्रकरणी बाबा रामदेव यांची सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी

आणि

- छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत नऊ नक्षलवादी ठार

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. परभणी लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विद्यमान खासदार संजय जाधव यांनी महाविकास आघाडीकडून आज अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेश टोपे यावेळी उपस्थित होते. शनिवार बाजार ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढत शक्ती प्रदर्शन करुन जाधव यांनी सभेला संबोधित केलं.

नांदेड लोकसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रीय किसान पक्षाचे विष्णू जाधव यांच्यासह जगदीश पोतरे, सुरज कदम, नागोराव वाघमारे आणि नय्यर जहाँ

मोहम्मद फेरोज हुसेन या अपक्ष उमेदवारांनी आज अर्ज दाखल केले. नांदेड लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत ११ अर्ज दाखल झाले आहेत.

वर्धा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अमर काळे यांनी महाविकास आघाडीकडून आज उमेदवारी अर्ज दाखल केला. पक्षाचे प्रमुख, खासदार शरद पवार यावेळी उपस्थित होते.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे प्रतापराव जाधव यांनी महायुतीकडून आज उमेदवारी अर्ज भरला. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यावेळी उपस्थित होते.

यवतमाळ –वाशिम लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार आदित्य ठाकरे आणि रोहीत पवार यावेळी उपस्थित होते.

****

काँग्रेस पक्षाने आज सतरा उमेदवारांची यादी जाहीर केली. यामध्ये ओडिशामधल्या आठ, आंध्र प्रदेश पाच, बिहार तीन, तर पश्चिम बंगालमधल्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाद्वारे महाराष्ट्रासह पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्मचारी, सुरक्षा दल आणि मतदान यंत्रांचं पर्यवेक्षण करण्याचं महत्त्वपूर्ण काम विशेष निरीक्षकांवर सोपवण्यात आलं आहे. विशेष निरीक्षक राज्याच्या मुख्यालयात थांबून तसंच स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून संवेदनशील भागाचा दौरा करतील, असं आयोगानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघाची मतमोजणी केंद्रं आणि त्याठिकाणी निर्माण करावयाच्या सुविधांचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा घेतला. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आवश्यक त्या उपाययोजना कराव्या, सुरक्षा यंत्रणा, संदेशवहन यंत्रणा, इंटरनेट आदींची उपलब्धता करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी यावेळी दिले.

****

नवमतदारांनी मतदान करुन आपलं कर्तव्य पूर्ण करावं, असं आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मतदान जनजागृती कक्षाच्या प्रमुख मिनल करनवाल यांनी केलं आहे. नांदेड शहरातल्या नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात तीनशे नवमतदारांसोबत संवाद साधताना त्या आज बोलत होत्या. मतदान आवश्यकता आणि गरज या विषयावर विविध उदाहरणं देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचं महत्त्व पटवून दिलं.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यात उद्या स्वयं सहाय्यता गटातल्या सुमारे एक लाख ८५ हजार महिला मतदान करण्याची शपथ घेणार आहेत. या मोहिमेत महिला आणि युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असं आवाहन करनवाल यांनी केलं आहे.

****

जागतिक ऑटीझम दिनानिमित्त लातूर जिल्ह्यात दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढून मतदानाविषयी जन जागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थित ३५० विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करत नागरिकांना मतदानाचं आवाहन केलं. जिल्हा परिषदेच्या इमारतीत उभारण्यात आलेल्या मतदार जनजागृती संकल्पनेचं उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी लातूर शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक इथं असंघटीत कामगारांशी संवाद साधून त्यांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

****

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बनावट मतदार ओळख पत्र तयार करुन शासनाची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार धुळे शहरात उघडकीस आला आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे मोहाडी उपनगरात एका फोटो स्टुडीओवर छापा टाकून बनावट मतदार कार्ड आणि साहित्य जप्त करण्यात आलं असून, याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या सर्व लोकसभा मतदार संघातली परिस्थिती आणि एकूण घडामोडींचा आढावा घेण्यासाठी, `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरून संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेदरम्यान प्रसारित केला जात आहे. आज या कार्यक्रमात रामटेक मतदार संघाचा आढावा ऐकता येणार आहे.

****

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येत्या दहा तारखेला रामटेक इथं जाहीर सभा होणार आहे. १४ एप्रिलला नागपूर मध्ये दीक्षाभूमी इथं दर्शन घेऊन, पंतप्रधान मोदी चंद्रपूर इथं सभा घेणार आहेत. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

चंद्रपूर लोकसभा मतदरासंघातले भाजप महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रचारादरम्यान वार्ताहरांशी संवाद साधला. जनतेच्या हितासाठी ही लढाई असून, आपल्याला नागरीकांचा आशिर्वाद मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

****

पतंजली आयुर्वेद कंपनीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरात प्रकरणी बाबा रामदेव यांनी आज सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती मागे घेण्याचे निर्देश देऊनही पतंजलीने त्या सुरुच ठेवल्याने त्यांच्याविरोधात अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. यासंदर्भात आज बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी आज न्यायालयात हजार राहून माफी मागितली. यावेळी न्यायालयानं रामदेव बाबा यांनी केलेल्या योगाच्या प्रचाराचं कौतुक केलं, मात्र दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींबद्दल नाराजी व्यक्त करत, भविष्यात सावध राहण्याचा इशारा दिला.

****

केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी मुंबईतल्या चारकोप इथं गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी आणि नागरिक यांच्यासोबत आज संवाद साधला. या संवाद कार्यक्रमाला गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी, व्यापारी, नागरिक, महिला उपस्थित होते.

****

दोन हजार रुपयांच्या सुमारे ९८ टक्के नोटा परत आल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं स्पष्ट केलं आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात दोन हजार रुपयांच्या आठ हजार २०२ कोटी रुपयांच्या नोटा चलनात असून, मे २०२३ मध्ये हीच संख्या जवळपास तीन लाख कोटी रुपये इतकी होती, असं बँकेनं आपल्या निवेदनात

म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं गेल्या वर्षीच प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत नागरिकांकडून या नोटा परत स्वीकारणार असल्याची घोषणा केली होती.

****

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत नऊ नक्षलवादी ठार झाले. केंद्रीय राखीव दल, कोबरा बटालियन आणि जिल्हा राखीव पोलिसांनी संयुक्तपणे बस्तर विभागातल्या गंगापूर भागात ही कारवाई केली. चकमकीनंतर पोलिसांना चार नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून, एक हलकी मशीनगन, ग्रॅनेड लाँचर आणि इतर शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

****

सांगली जिल्ह्याच्या कंवठेमहाकाळ तालुक्यात आज झालेल्या अपघातात चार ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाला असून, १० जण जखमी झाले. रत्नागिरी – नागपूर महामार्गावर आगळगाव फाटा इथं ऊसतोड कामगार असलेल्या ट्रॅक्टरला भरधाव आयशर टेम्पो नं पाठीमागून धडक दिल्यानं हा अपघात झाला.

****

नांदेड जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्यात एकाच दिवशी घडणाऱ्या बालविवाहांना महिला आणि बाल विकास विभाग, जिल्हा आणि पोलीस प्रशासन यांच्या सहकार्यानं रोखण्यात यश आलं. महिला आणि बाल विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवून हे बालविवाह समुपदेशनाच्या माध्यमातून थांबवण्यात आले. जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी ग्राम बालसंरक्षण समितीने आपली भूमिका कर्तव्यदक्षपणे पार पाडावी, असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केलं आहे.

****

प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेनं जालना – छपरा– जालना या साप्ताहिक विशेष गाडीला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. २६ जून पर्यंत ही गाडी नियमित वेळेनुसार धावेल, अशी माहिती नांदेड कार्यालयानं दिली आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना लखनऊ सुपर जायंट्स सोबत होणार आहे. बंगळुरूच्या एम.चिन्नास्वामी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.